



श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता – चौथी (7 जुलै) माझा अभ्यास

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस सातवा :






ब्रीज कोर्ससोबत चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट (वापरणे सक्ती नाही.)

उतारा वाचा व समजून घ्या.

## २. बोलणारी नदी

टेस्ट सोडवा

काही दिवसांनी आला भोला. भोला म्हणजे लीलाचा मामा. भोलामामा नेहमी खाऊ घेऊन यायचा. त्या दिवशी नेमकी लीला शाळेत निघाली तेव्हा तिचा मामा आला. लीलाला खूप आनंद झाला. ''काय खाऊ आणलास ?'' तिने विचारले.

भोलामामा म्हणाला,

*''लीला गं लीला,*
*माझ्या लाडक्या बाळा,*
*खाऊ म्हणून आणलेत*
*बदामी पेढे सोळा !''*


'सोळा पेढे ! ते पण बदामी !' लीला एकदम खूश झाली; पण शाळेला जायला उशीर होत होता म्हणून ती पळाली. ''संध्याकाळी आल्याबरोबर मी पेढे खाणार !'' लीला ओरडतच गेली. शाळेत दिवसभर तिच्या डोळ्यांसमोर पेढे नाचत होते. ''पेढे कुठे आहेत ?'' लीलाने आल्याबरोबर विचारले. आई म्हणाली, ''शिंकाळ्यावरच्या बुट्टीत डबा ठेवलाय बघ !'' लीलाने स्टूल घेऊन डबा काढला. उघडून पाहते तर डबा सगळा रिकामा. ''आईऽऽ, यात तर एकपण पेढा नाही !'' लीला ओरडली. लीलाचे ओरडणे ऐकून आईला नवल वाटले. आई म्हणाली, ''अगं, असं कसं होईल ?'' तिने ताईला हाक मारली, ''नीला, ए नीला.'' ''काय गं आई?'' नीला परसातून पळत आली. ''अगं, पेढे कुठे गेले ?'' आईने विचारले. ''कुठे गेले म्हणजे मीच खाल्ले. मी खाल्ले आठ अन् नदीला दिले आठ.'' नीला म्हणाली.

''तू बदामी पेढे नदीत टाकलेस ! मूर्ख कुठली.'' आई नीलावर ओरडली. ''अगं हो. तू म्हणालीस,




टेस्ट सोडवा

## वाचा व समजून घ्या. वर्तुळ काढा.




कागदाच्या घड्या उलगडा. मूळचा वर्तुळाकृती कागद दिसेल. घड्यांनी झालेल्या रेषा पेन्सिलने गिरवा.
या रेषा एकमेकींना जिथे मिळतात तो बिंदू म्हणजे **वर्तुळाचे केंद्र** किंवा **वर्तुळमध्य** असतो.




वर्तुळाच्या मध्यबिंदूला 'म' हे नाव द्या. वर्तुळावर कोठेही 'प' बिंदू घ्या. पट्टीने 'मप' ही रेघ काढा. 'मप' ही वर्तुळाची **त्रिज्या** आहे.

### कंपासच्या साहाय्याने वर्तुळ काढणे




एक कागद घ्या. आकृतीत दाखवल्याप्रमाणे कागदाच्या साधारण मध्यावर एक बिंदू घ्या. कंपासचे पोलादी टोक व पेन्सिलचे टोक यामध्ये योग्य अंतर घ्या. कंपासचे पोलादी टोक घेतलेल्या बिंदूवर स्थिर ठेवून पेन्सिलचे टोक फिरवून वर्तुळ काढा.



कंपासचे टोक ठेवलेला बिंदू लाल ठिपक्याने दाखवा. आता वर्तुळाकार कागद कापून घेऊन त्याच्या घड्या घालून पूर्वीप्रमाणे दोन व्यास काढा. ते व्यास लाल ठिपक्यावर एकमेकांना मिळतात हे अनुभवा, म्हणजे लाल ठिपका त्या वर्तुळाचे केंद्र किंवा वर्तुळमध्य आहे.


खालील वर्तुळाच्या आकृत्या पाहून बाणाने दाखवलेल्या रेषा जीवा, व्यास, त्रिज्या यांपैकी काय आहेत, हे त्याखालील चौकटींत लिहा.




**उपक्रम :** कागदावर वर्तुळ काढण्यासाठी बांगडी, बशी, नाणी, बाटलीचे झाकण अशा वस्तूंचा उपयोग करून वेगवेगळी वर्तुळे काढा.
खेळासाठी वर्तुळाकार मैदान कसे आखतात, हे शिक्षकांकडून माहीत करून घ्या.


## Read and understand.

टेस्ट सोडवा




Unfold the paper shape. Now, you see the circular shape again. Trace the lines of the folds.

The point at which these lines meet each other is the **centre** of the circle.





Name the centre of the circle, M. Take any point P on the circle. Draw the line MP with your ruler. MP is a **radius** of the circle.

### Drawing a circle using a compass




Take a piece of paper. Choose any point near the middle of the paper. Take a suitable distance between the steel tip of the compass and the tip of the pencil. Place the steel tip on the chosen point. Hold it in place and turn the pencil tip around it to trace a circle.



Mark with a red pencil, the point at which you held the steel tip. Now cut out this circle. Fold it twice as before to obtain two diameters of the circle. Observe that these two diameters meet at the red point. It means that the red point is the centre of the circle.

Look at each circle. Is the line shown by the arrow a chord, a diameter or a radius of the circle? Write it in the box below.




**Activity :** Draw different circles using things like the lid of a jar, a saucer, a bangle and coins. Find out from your teacher how a circular playing field is marked on the ground.

**Words from Letters**

टेस्ट सोडवा

revision

1. **Read aloud the names of the letters on the cards.**
कार्डांवरील इंग्रजी अक्षरांची नावे मोठ्याने वाचा.


A B C D E
F G H I J
K L M N O
P Q R S T
U V W X Y Z

a b c d e
f g h i j
k l m n o
p q r s t
u v w x y z

2. **Say the names of the letters 'a' to 'z' in alphabetical order.**

3. **Form pairs. Say 'a-z' in pairs, in different ways.**

* a - b, c - d, e - f, g - h, i - j, k - l, .........
* ab - cd, ef - gh, ij - kl, mn - op, ........
* a - 1, b - 2, c - 3, d - 4, e - 5, ........
* a - z, b - y, c - x, ..., m - n.



HOME WORK

कार्डशीटच्या उभ्या पट्टीवर 'a' ते 'z' अक्षरे क्रमाने लिहून 'बुक-मार्क' तयार करा. असे रंगीत 'बुक-मार्क' तयार करून इतरांना भेट द्या.

## १. प्राण्यांचा जीवनक्रम

पाठ समजून वाचून खालील स्वाध्याय सोडवा.

टेस्ट सोडवा



### स्वाध्याय

**(अ) जरा डोके चालवा.**



(१) कोंबडीच्या अंड्यातून पिल्लू बाहेर पडायला २० ते २२ दिवस लागतात. इतर पक्ष्यांच्या अंड्यांतून पिल्ले बाहेर पडायला तितकेच दिवस लागत असतील का ?

(२) गवतात भिरभिरणारा चतुर तुम्ही नक्कीच पाहिला असेल. अंडे, सुरवंट, कोश आणि प्रौढ या चार अवस्थांपैकी ही कोणती अवस्था आहे ?

(३) पालेभाजी निवडायला घेतली, की काही पानांना वेगवेगळ्या आकाराची भोके पडलेली दिसतात. काही पानांच्या कडा कुरतडलेल्या दिसतात. त्याचे कारण काय असेल ?

(४) पावट्याच्या किंवा मटारच्या शेंगा निवडायला घेतल्या, की कधीकधी त्यात हिरवे छोटे सजीव आढळतात फुलपाखराच्या वाढीतील चार अवस्थांपैकी ती कोणती अवस्था असते.

**(आ) थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) कोंबडीला अंडी का उबवावी लागतात ?

(२) अंडी उबवण्याच्या काळात कोंबडी आक्रमक का होते ?

(३) फुलपाखराच्या वाढीच्या चार अवस्था कोणत्या ?

(४) कोश या अवस्थेत बिबळ्या कडवा या फुलपाखराच्या शरीरात कोणकोणते बदल होतात ?

**(इ) चूक की बरोबर ते सांगा.**

(१) शेळीचे पिल्लू अंड्यातून बाहेर येते.

(२) मुंग्यांची अंडी खूप छोटी असल्याने ती सहजासहजी दिसत नाहीत.

(३) अंड्यांतून फुलपाखरांचे सुरवंट बाहेर पडतात तेव्हा त्यांना फारशी भूक नसते.

**(ई) गाळलेले शब्द भरा.**

(१) फुलपाखराची मादी वनस्पतीच्या पानावर .................... घालते.

(२) फुलपाखरांच्या .................... सुरवंट म्हणतात.

**उपक्रम**

- बिबळ्या कडवा या फुलपाखराचे चित्र काढा आणि रंगवा.
- इतर फुलपाखरांची रंगीत चित्रे जमा करा आणि वहीत चिकटवा.

***

सराव

टेस्ट सोडवा

## २. संतांची कामगिरी

महाराष्ट्रात श्रीचक्रधर, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा या संतांपासून सुरू झालेली संतपरंपरा समाजाच्या विविध स्तरांमधून आलेल्या संतांनी पुढे चालविली. या संत मंडळींमध्ये संत गोरोबा, संत सावता, संत नरहरी, संत एकनाथ, संत शेख महंमद, संत तुकाराम, संत निळोबा इत्यादी संतांचा अंतर्भाव होतो. त्याचप्रमाणे संत जनाबाई, संत सोयराबाई, संत निर्मळाबाई, संत मुक्ताबाई, संत कान्होपात्रा आणि संत बहिणाबाई शिऊरकर यांचाही अंतर्भाव होतो.

त्यांनी लोकांना दया, अहिंसा, परोपकार, सेवा, समता, बंधुभाव इत्यादी गुणांची शिकवण दिली. कोणी लहान नाही, कोणी मोठा नाही, सगळे सारखे अशी समतेची भावना संतांनी लोकांच्या मनांत निर्माण केली. तसेच महाराष्ट्रात समर्थ रामदासांनी आपले कार्य केले.



श्रीचक्रधर स्वामी

**श्रीचक्रधर स्वामी :** श्रीचक्रधर स्वामी मूळ गुजरातमधील एक राजपुत्र. वैराग्यवृत्ती धारण करून ते महाराष्ट्रात आले. येथे भ्रमण करत असता त्यांनी समतेचा उपदेश केला. त्यांना स्त्री–पुरुष, जातीपाती हे भेदभाव मान्य नव्हते.त्यामुळे त्यांना अनेक स्त्री–पुरुष अनुयायी मिळाले. त्यांनी स्थापन केलेल्या पंथास ‘महानुभाव पंथ’ असे म्हणतात. श्रीचक्रधर स्वामींच्या आठवणींचा संग्रह म्हणजे ‘लीळाचरित्र’ हा ग्रंथ होय.

**संत नामदेव :** संत नामदेव विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. ते नरसी गावचे राहणारे. त्यांनी अनेक अभंग रचले, कीर्तने केली व जनतेत



संत नामदेव

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here